४/०९/२०२५

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

सदरील वृत्त आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध करावे, ही विनंती

## परस्पर वृक्षतोड करणाऱ्यांवर नोंदवले गुन्हे

परवानगी घेऊनच निर्णय घ्यावा; पीएमआरडीए महानगर आयुक्त यांचे आवाहन

**पुणे / पिंपरी (दि.३) :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीत परस्पर वृक्षांची तोड करणाऱ्यांवर गुन्हे नोंदविण्यात आले आहे. पर्यावरणाचे संवर्धन व्हावे, या उद्देशाने नागरिकांसह विकसकांनी परवानगी घेऊनच वृक्षतोडसंदर्भात पुढील निर्णय घ्यावा, अन्यथा नियमानुसार संबंधितांवर गुन्हे नोंदविण्याचे निर्देश महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिले. पीएमआरडीएच्या आकुर्डी कार्यालयात झालेल्या वृक्ष प्राधिकरण समितीच्या बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले.

पर्यावरणाचे संवर्धन व्हावे, या उद्देशाने पीएमआरडीएच्या माध्यमातून काही महत्त्वकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आले आहे. त्या अनुषंगाने अनधिकृत आणि परस्पर वृक्षतोड होऊ नये, यासाठी वृक्ष प्राधिकरण समितीच्या बैठकीत काही ठोस निर्णय घेण्यात येत असून आतापर्यंत प्राप्त झालेल्या १८ तक्रारीनंतर त्याची शहानिशा केल्यानंतर ८ जणांवर पंचनामाच्या आधारे गुन्हे नोंदविण्यात आले. यासह उर्वरित १० तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी सुरू असून पंचनामाचा अहवाल आल्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येणार आहे. परस्पर वृक्षतोड होत असेल किंवा प्राप्त तक्रारींच्या आधारे अहवालानंतर तसे सिद्ध झाल्यास संबंधित सुरू असलेल्या बांधकामाची परवानगी देखील थांबवण्यात येणार असल्याचे यावेळी महानगर आयुक्त यांनी स्पष्ट केले.

वृक्षतोडीसंदर्भात अर्ज प्राप्त झाल्यानंतर पीएमआरडीएचे अधिकारी, कर्मचारी स्थळ पाहणीनंतर संबंधित परवानगी द्यायची किंवा नाही याबाबत निर्णय घेतात. त्यामुळे नागरिकांसह विकसकांनी पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने वृक्षतोडसंदर्भात परवानगी घेऊनच पुढील निर्णय घ्यावा, असे आवाहन पीएमआरडीएतर्फे यावेळी करण्यात आले. या बैठकीत वृक्षतोड संदर्भात प्राप्त झालेल्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. या बैठकीला महानगर आयुक्त डॉक्टर योगेश म्हसे, अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, विकास परवानगी व नियोजन विभागाचे संचालक अविनाश पाटील, वृक्ष अधिकारी महेश पाटील यांच्यासह वृक्ष प्राधिकरण समितीचे सदस्य उपस्थित होते.

- डॉ. ज्ञानेश्वर भाले, जनसंपर्क अधिकारी, पीएमआरडीए